


वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र

# अहवाल

## दीक्षाभूमी ते मंत्रालय

# पत्रकार संवाद यात्रा

लोकशाहीच्या बळकटीसाठी...
पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी...!

दि. २८ जुलै ते २० ऑगस्ट २०२४



## परिचय

**नाव :** वसंत माधवराव मुंडे

**जन्मस्थळ :** लाडझरी, ता.परळी जि.बीड

**प्रदेशाध्यक्ष :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई.

**शैक्षणिक पात्रता :** बी. ए., बी. जे. (डॉ. बा. आं. म. वि., छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र)

**बीड जिल्हा प्रतिनिधी :** दैनिक लोकसत्ता २००३ ते २०२४

**अध्यक्ष :** महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद विभागीय पत्रकार अधिस्वीकृती समिती (२०१५)

**जिल्हाध्यक्ष :** बीड जिल्हा मराठी पत्रकार संघ (२००६)

**प्रदेश कार्याध्यक्ष :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई (२०१४ ते २०२०)

## पुरस्कार

- मराठी वृत्तवाहिनी 'एबीपी माझा'चा 'महाराष्ट्राचे अनमोल रत्न' हा पुरस्कार (२०२३)
- लोकमतचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अॅवार्ड (२०२३)
- राष्ट्रसंत भगवानबाबा सेवा गौरव पुरस्कार, पाटोदा, बीड.
- राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज स्मृती राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार.
- कळंब तालुका पत्रकार संघाचा मोहेकर गुरुजी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार.
- तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या समवेतच्या ग्रामीण विकास संदर्भातील राष्ट्रीय परिषदेसाठी निवड (२००७)
- ऊसतोड मजुरांवरील लेखमालेकरीता समर्थन संस्थेची राज्यस्तरीय शिष्यवृत्ती (१९९९)
- उस्मानाबाद जिल्हा पत्रकार संघाचा शोध वार्ता गटातील प्रथम पुरस्कार.

## निर्मिती

- लोकसत्ता दैनिकातून लिहिलेल्या शेतकऱ्यांच्या यशोगाथेवरील 'शब्दशिवार' पुस्तकाची निर्मिती.
- इतिहास संशोधक पत्रकार स.मा.गर्गे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बीड येथे गर्गे भवन आणि वाचनालयाची निर्मिती.
- छत्रपती संभाजीनगर येथून दै.आधुनिक केसरीची सुरुवात.



नागपूर
दि.२८ जुलै २०२४
दीक्षाभूमी वंदन,
यात्रा शुभारंभ
वर्धा
दि.२८ जुलै २०२४
(मुक्काम)
सेवाग्राम भेट, पत्रकार परिषद
अमरावती
दि.२९ जुलै २०२४
(मुक्काम)
पत्रकार परिषद
अकोला
पत्रकार परिषद
शेगाव
दि.३० जुलै २०२४
मुक्काम (दर्शन)
पत्रकार परिषद
मुक्ताईनगर
दर्शन
जळगाव
दि.३१ जुलै २०२४
मुक्काम
पत्रकार परिषद
धुळे
पत्रकार परिषद
नाशिक
दि.१ ऑगस्ट २०२४
(मुक्कम)
पत्रकार परिषद
काळाराम मंदिर
शिर्डी
दि.२ ऑगस्ट २०२४
(मुक्कम) साईबाबा दर्शन
पत्रकार परिषद
संभाजीनगर
(जालना)
पत्रकार परिषद
बीड
मुक्काम
पत्रकार परिषद
धाराशिव
लातूर
पत्रकार परिषद
सोलापूर
पत्रकार परिषद
पंढरपूर
मुक्काम
विठ्ठल दर्शन
पत्रकार परिषद
सांगली
पत्रकार परिषद
कोल्हापूर
मुक्काम
पत्रकार परिषद
विविध ठिकाणी भेटी
व देवी दर्शन
सातारा
मुक्काम
पत्रकार परिषद
विविध मान्यवरांच्या भेटी
बारामती
पत्रकार परिषद
पुणे
मुक्काम, पत्रकार परिषद
दगडूसेठ गणपती दर्शन
पनवेल
मुक्काम,
पत्रकार परिषद
ठाणे
पत्रकार परिषद
मुंबई
यात्रा समारोप
जाहिर कार्यक्रम
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई
दीक्षाभूमी ते मंत्रालय
पत्रकार संवाद
यात्रा
पत्रकारांच्या संरक्षणासाठी...
लोकशाहीच्या रक्षणासाठी...!
वसंत मुंडे (प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र)
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

# संवाद यात्रा... सर्वसामान्य पत्रकारांसाठी !

भारतीय लोकशाहीचा पत्रकारिता चौथा स्तंभ मानला जातो. राज्यकर्त्या सरकारी व्यवस्थेवर अंकुश आणि समाज जनजागृतीचे व्यापक काम वृत्तपत्रांच्या माध्यमातून अविरतपणे केले जाते. आकाशाला भिडणारी महागाई, समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव, यामुळे जाहिरातींचे प्रमाण कमी झाल्याने वृत्तपत्र व्यवसाय आणि त्यावर अवलंबित असणारे पत्रकार आर्थिक विवंचनेत आले आहेत. कोरोना वैश्विक महामारीत महाराष्ट्रात १५० पेक्षा अधिक पत्रकारांचा कर्तव्य बजावताना मृत्यू झाला, पण घोषणा करूनही सरकारने मदत केली नाही. अनेक वर्तमानपत्रांनी आवृत्या बंद करून शेकडो पत्रकार व कर्मचार्यांना घरचा रस्ता दाखवला. उर्वरितांना अल्प वेतनावर काम करावे लागते आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या काही पत्रकारांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या. मात्र समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांचे दु:ख कोणी समजून घेत नाही, हे भयाण वास्तव आहे.

निष्ठेने आणि प्रामाणिकपणे काम करणऱ्या पत्रकारांनाही काही प्रश्न, समस्या असतात याचा विचार होत नाही. गेल्या दहा वर्षांत इंधनाचे दर, पेट्रोल ६० रूपयांवरून ११० रुपयांपर्यंत तर डिझेलही ५० रुपयांवरून १०० पर्यंत वाढलेले आहेत. एक कप चहा २ रुपये वरून १० रुपयांपर्यंत रुपये गेला. इतरही दैनंदिन लागणाऱ्या सर्वच वस्तुंच्या किमती जवळपास चार पटीने वाढल्या. मात्र दररोज घरपाहोंच स्वस्तात देण्याच्या पारंपरिक आर्थिक धोरणामुळे बारा पानी वृत्तपत्राची विक्री किंमत पाच रुपयापर्यंतच आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत केवळ ३० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव असे उत्पादन आहे. उत्पादन खर्च जास्त आणि विक्री किंमत कमी यामुळे वृत्तपत्र व्यवसाय आणि काम करणाऱ्या पत्रकारांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांना तर नाममात्र मानधनावरच काम करावे लागते.

महाराष्ट्र शासनाने पत्रकारांसाठी काही योजना सुरू केल्या, मात्र जाचक अटींमुळे पात्र पत्रकारांनाही या योजनेचा लाभ होत नाही. एक दशकाच्या लढ्यानंतर पत्रकार हल्ला विरोधी संरक्षण कायदा मंजूर झाला. मात्र त्याची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होत नाही. तर बाळशास्त्री जांभेकर सन्मान (पेन्शन) योजना सुरू केली, त्यातील काही अटींमुळे ज्येष्ठ पत्रकारांना लाभ होत नाही. दोन-दोन वर्ष प्रस्ताव तृट्यांमध्ये ठेवले जात असल्याने अनेक ज्येष्ठ पत्रकार निवृत्ती वेतन मिळण्याच्या प्रतिक्षेतच मृत्युमुखीही पडले आहेत. सरकारने वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीवर, छपाईच्या कागदावर जीएसटी कर लावला मात्र शासकीय जाहिरातींचे दर त्या तुलनेत वाढवले नाही. परिणामी खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाल्याने विभाग, जिल्हा व तालुका पातळीवरील अनेक छोटी वर्तमानपत्र बंद पडत आहेत. परिणामी लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाचा आवाज कमजोर होण्याची भीती निर्माण झाली आहे.

स्थानिक व्यवस्थेला प्रश्न विचारणारे, सामान्य माणसाच्या समस्या मांडणारी छोटी वृत्तपत्र व्यवस्थाही टिकली पाहिजे. काही हजार कोटी रूपयांच्या वृत्तपत्र व्यवसायावर पत्रकारांबरोबरच अनेकांचा रोजगार अवलंबून आहे. महाराष्ट्रात पन्नास हजारापेक्षा जास्त संख्या असलेल्या पत्रकार घटकाचे प्रश्न कोणी मांडत नाही. मात्र समाजातील प्रस्थापित व्यवस्था, स्थानिक प्रशासन यांच्या विरुद्ध पत्रकारांनी संघर्ष करावा, अशी अपेक्षा ठेवली जाते. अशा परिस्थितीत पत्रकारांच्या न्यायासाठी राज्य पत्रकार संघाने सातत्याने लढा दिला आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे मागण्या करून पाठपुरावा सुरू आहे. राज्यात सर्वाधिक ३० हजार सदस्य संख्या असल्याने संघटनेचा जिल्हा, शहर, गाव पातळीवर मोठा प्रभाव आहे. प्रसार माध्यमात काम करणाऱ्या पत्रकार व कर्मचार्यांचा एक घटक समजून प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे. यासाठी समाजातील विविध घटकांनी पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षा आहे. राज्यकर्ते मतपेटीचा विचार करूनच कोणत्याही घटकाचे प्रश्न सोडवण्याची मानसिकता ठेवत असतील तर पत्रकारांनीही न्यायासाठी राजकीय विचार करावा का? राज्यकर्त्यांनी पत्रकारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, यासाठी संवाद यात्रेच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न केंद्रस्थानी यावेत ही अपेक्षा..!

धन्यवाद !

# प्रमुख मागण्या

- **केंद्र सरकारकडे पाठविण्याचे प्रस्ताव :**

१) केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना (डिजीटलसह) उत्पन्न करात वार्षिक ५००० सूट द्यावी. असा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा.
२) सरकारने वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींवरील ५ % जीएसटी कर रद्द करावा. यासाठी केंद्र सरकारला प्रस्ताव द्यावा.

- **राज्य स्तरावरील मागण्या :**

१) वृत्तपत्र व माध्यमसमूहांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे.
२) माध्यम क्षेत्रासाठी स्वतंत्र स्टेट प्रेस कौन्सिल निर्माण करावे.
3) विधानपरिषदेवर राज्यपाल नामनिर्देशित सदस्यत्वासाठी पत्रकारांमधून निवड करावी.

- **गृह विभाग स्तरावरील मागणी :**

१) पत्रकार संरक्षण कायदा मंजूर करण्यात आला आहे, मात्र स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होत नाही. त्यासाठी पोलिस प्रशासनाला आदेश द्यावेत.
२) अलीकडे बातमी प्रसिद्ध किंवा दाखवण्यात आली की थेट पोलिस ठाण्यात पत्रकारांविरूध्द गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे प्रसिद्ध बातमीबाबत पत्रकाराविरुद्ध तक्रार आल्यास उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करूनच गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी. यासाठी पोलिस विभागाला निर्देश द्यावेत.

- **ग्रामविकास विभाग स्तरावरील मागणी :**

१) महाराष्ट्र शासनाने ग्रामपंचायतींना वार्षिक आराखड्यात गाव तिथे ग्रंथालय धोरणाअंतर्गत स्थानिक वृत्तपत्र खरेदीसाठी १० हजार रुपये तरतूद करावी यासाठी ग्रामविकास विभागाने स्वतंत्र आदेश काढावा.
२) स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील शासकीय समित्यांवर पत्रकारांमधून एक प्रतिनिधी घ्यावा.
३) शासकीय, निमशासकीय शाळा महाविद्यालयांमध्ये वर्तमानपत्र खरेदीसाठी तरतूद करावी.

- **माहिती आणि जनसंपर्क विभागाकडील मागण्या :**

१) आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील सलग तीस वर्षे सेवेची अट शिथील करून प्रक्रिया सुलभ करावी. तसेच दाखल झालेले प्रस्ताव सहा महिन्याच्या मर्यादेत निकाली काढून पेन्शन सुरू करावी. सध्या तीन वर्षे झाले तरी प्रस्ताव मंजूर होत नाहीत.
२) अधिस्वीकृती पत्रिका ग्रामीण भागातील पत्रकारांना मिळावी यासाठी वेतन चिठ्ठीची अट रद्द करावी. कारण बहुतांशी पत्रकार मानधनावर काम करतात. संपादकांच्या शिफारशीनुसार जिल्हा दैनिकांच्या तालुका वार्ताहरांनाही अधिस्वीकृती देणेबाबत प्रक्रिया सुलभ करावी.
३) अधिस्वीकृती मंजूर करताना दुय्यम व्यवसाय नसल्याचे प्रतिज्ञापत्र देण्याची अट रद्द करावी.
४) अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना पुर्वीप्रमाणे रेल्वेत ५० टक्के आरक्षण आणि स्लीपर कोच बस, विमान प्रवासात सवलत द्यावी.
५) सरकारने घोषणा केल्याप्रमाणे अधिस्वीकृतीधारक पत्रकारांच्या वाहनांना महामार्गावर टोलमाफीसाठी स्वतंत्र आदेश द्यावेत.
६) २०१८ च्या शासन धोरणानुसार जाहिरातींच्या दरात दर दोन वर्षांनी नियमितपणे वाढ करावी.
७) शासकीय पुरस्कार दरवर्षी दर्पण दिनी वितरीत करावे यामध्ये तीन वर्षापासून खंड पडला आहे.
८) शासकीय जाहिरातीचे वितरण करताना स्थानिक पातळीवरील जिल्हा दैनिके, साप्ताहिके यांच्यावर वर्गवारीच्या नावाखाली होणारा अन्याय थांबवावा. समान न्यायाच्या धोरणाने वितरण व्हावे. तसेच महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थानिक दैनिके व साप्ताहिकांना प्राधान्याने जाहिरात द्यावी. वर्षातून चार दर्शनी जाहिराती पुन्हा नव्याने सुरू करण्यात याव्यात.
९) कोरोना काळात वृत्तपत्रांच्या खपावर परिणाम झाला असल्याने द्विवार्षिक पडताळणीत खपाबाबतचे नव्याने धोरण निर्माण करावे. तसेच शासन यादीवर येण्यासाठी एक हजार अंक खपाची मर्यादा करावी.
१०) दरवर्षी माध्यम संस्थेकडून पत्रकारांची यादी घेवून पत्रकारांची अधिकृत गणना करून शासकीय लाभ देण्याचा निर्णय घ्यावा.
११) वीस वर्षे पूर्ण केलेल्या नियमित दैनिके व साप्ताहिके यांना द्विवार्षिक पडताळणीतून वगळावे.
१२) अधिस्वीकृती समिती राज्य आणि विभाग स्तरावर कामगार कायदा (लेबर युनियन ॲक्ट १९२६) अंतर्गत नोंद असलेल्या संघटनांना प्रतिनिधित्व द्यावे.
१३) मुंबईप्रमाणे म्हाडा अंतर्गत शासकीय जमीन म्हाडाला देऊन जिल्हा व तालुका स्तरावर पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण प्रकल्प राबवावा.
१४) जुनी वर्तमानपत्रे ही मूल्यवान ठेवा असल्याने ऐतिहासिक घटना जतन करण्यासाठी त्यांना संगणीकृत करण्यासाठी विशेष सवलत द्यावी.
१५) डिजिटल मिडियाला (न्युज पोर्टल, युट्यूब चॅनेल) निकष ठरवून शासनमान्यता द्यावी.
१६) जिल्हा, तालुका पातळीवरील प्रमुख शासकीय कार्यालयात पत्रकार कक्ष स्थापन करावा.
१७) माध्यम समूहाकडून नाममात्र मानधन मिळत असल्याने सलग पाच वर्षे सेवा केलेल्या पत्रकारांना शासनाने दरमहा मानधन योजना सुरू करावी.

■

# पत्रकारांचा नायक ...!

लोकसत्ताच्या माध्यमातून २० वर्षांपासून रचनात्मक पत्रकारिता करणारे श्री.वसंत मुंडे आता नव्या भूमिकेत महाराष्ट्रासमोर आले आहेत. कदाचित हा मुंडे या नावाचा महिमा. या नावात उपजत नेतृत्वगुण असल्याने त्यांच्याकडे लिडरशीप असल्याचे पहायला मिळते. वसंत मुंडे यांचा पत्रकारितेतील प्रवास अनेक अनुभवांनी संपन्न आहे. त्यांचा जन्म एका खेड्यातला असल्याने, ग्रामीण संस्कृतीचा बाज त्यांच्या व्यक्तीमत्वामध्ये दिसून येतो. महाविद्यालयीन शिक्षणासाठी शहरात आलेल्या मुंडेचा नकळतपणे पत्रकारितेशी संपर्क आला. पत्रकार होणे त्यांचे ध्येय नव्हते. परंतु व्यक्तीचे कर्म विधीलिखित असल्यामुळे आज ते पत्रकारितेच्या क्षेत्रात सक्षम नेतृत्व करत आहेत. त्यांची पत्रकारिता नावाप्रमाणे बहरत गेली.

बीड जिल्ह्याच्या ठिकाणी पत्रकारीता करत असताना मुंडे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष झाले आणि अल्पावधीत सीमोल्लंघन करुन त्यांनी राज्य पत्रकार संघात आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवला. लेखणीच्या माध्यमातून आपण समाजाला न्याय देवू शकतो हे सिध्द करत असताना मूळ शेतकरीपुत्र असल्याने त्यांनी शेतीच्या विषयावर बख्खळ लिखाण केले. अनेक सामाजिक संस्थांना लोकसत्ताच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ उभा करुन दिले. जिल्ह्याच्या सामाजिक जडणघडणीत वसंत मुंडे यांच्या लेखणीचे सर्वोच्च योगदान राहिले आहे. पण समाजाचे प्रश्न सोडवणाऱ्या लेखणीचे प्रश्न मात्र उपेक्षित आहेत हे लक्षात घेऊन परिवर्तनाचे वारे त्यांच्या मनात वाहिले. शिवाणकाम करणाऱ्या सुईला आयुष्यभर स्वत:चे वस्त्र मिळत नाही. तशीच अवस्था लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांची झाली असल्याने या पत्रकारांना आत्मभान देण्याचे काम त्यांनी सुरु केले.

कवि अनंत सुतनासे यांनी पत्रकारीतेची वेदना मांडताना असे म्हटले आहे की,

'चल भेदु तिमिराला,हाती मशाल घे,लेखणीला साथ दे ॥धृ॥<br>
मांडले वैफल्य किती,फोडल्या वाचा किती,<br>
त्याच्याच याचनेला,एकदा तू साद दे ॥१॥<br>
ही लढाई खऱ्याची तुझ्या माझ्या घराची,<br>
संवादाच्या वाटेवरती हातात हात दे ॥२॥<br>
जनांचेच मी दर्पण केलेली मला अर्पण,<br>
मी पाईक आजचा तु उद्याची बात दे<br>
लेखणीला साथ दे ॥३॥

या शब्दरचने प्रमाणे उपेक्षीत राहिलेल्या लेखणीला साथ देण्याची साद घालून संवादाची प्रक्रीया गतीमान करुन राज्यात पत्रकारांची एक विधायक चळवळ उभी केली. ही चळवळ म्हणजे गरजवंत पत्रकारांचा एक लढाच...! पत्रकारांच्या प्रश्नांसाठी मुंडेंनी घर सोडले आणि संपुर्ण महाराष्ट्र पादाक्रांत केला.

महाराष्ट्र शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष असताना मुंडे यांनी  प्रत्येक जिल्ह्यात खुली चर्चा  उपक्रम राबवत संवादाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. प्रशासनाला सोबत घेवून मुंडे थेट पत्रकारांच्या दारी पोहचले. ज्येष्ठ पत्रकारांना घरपोहोच अधिस्वीकृती देण्याचा तसेच जिल्हा दैनिकाच्या तालूका पातळीवर काम करणाऱ्या पत्रकारांना योजनेचा लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. संधी मिळते तेव्हा त्याचा उपयोग इतरांसाठी जो करतो तोच खरा नेता असतो. वसंत मुंडे यांना पत्रकारीतेच्या क्षेत्रात काम करताना जी संधी मिळाली त्याचा प्रामाणिकपणे इतरांसाठी करुन देण्यासाठी त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर केला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्षपद मिळाल्यानंतर त्यांनी सर्व विभागात वृत्तपत्राचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर स्वतंत्र अधिवेशने घेतली. कोरोना महामारीत वृत्तपत्र उद्योग कोलमडून पडला. या आपत्तीतून इष्टापत्ती शोधण्याचे काम वसंत मुंडे यांनी केले. वृत्तपत्र व्यवसायावर लाखो लोकांचा रोजगार अवलंबून आहे. दरवर्षी हजारो कोटींची उलाढाल असल्याने मानवविकास निर्देशांक वाढीस याचा थेट संबंध आहे. म्हणून वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आयकरामध्ये ५ हजार रु.सवलत द्यावी अशी मागरी वसंत मुंडे यांनी सरकारकडे केली. महाराष्ट्रातील सर्व राजकिय पक्षांनी या सूचनेचे स्वागत केले. केंद्रात अर्थ राज्यमंत्री असताना डॉ.भागवत कराड यांनी सुध्दा ही कल्पना खूप परिणामकारक ठरेल असे सांगितले. या मागणीची अंमलबजावणी होईल तो दिवस खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांसाठी आर्थिक स्वातंत्र्यदिन असेल.

वृत्तपत्र व पत्रकारांसाठी शाश्वत आणि दुरगामी योजनांचा आग्रह धरुन राज्यभर एक मोठी चळवळ उभी करत असताना वसंत मुंडे यांनी २८ जुलै २०२४ रोजी आणखी एक क्रांतिकारक पाऊल टाकले. यापूर्वी कधीच कोणाच्या लक्षातही आले नाही असा विषय समोर आणला. दीक्षाभुमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढून मुंडेंनी संपूर्ण राज्याचे लक्ष एका दिशेने वळवले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटनाकार आहेत त्यापूर्वी ते पत्रकार होते. अशा महामानवाच्या दिक्षाभूमीवर वंदन करुन पत्रकारांसाठी एक ऐतिहासिक जागर सुरु केला. २४ दिवसांच्या यात्रेला मिळालेला प्रतिसाद न भुतो न भविष्यती असाच. गरजवंत पत्रकार रस्त्यावर उतरले. परिवर्तनाची एक नवी लढाई या माध्यमातून सुरु झाली. पत्रकारांचा नायक म्हणून महाराष्ट्राने आता वसंत मुंडे या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. येणाऱ्या काळात पत्रकारांचा हा आवाज आणखी बुलंद होत राहिल.

**- संतोष मानूरकर**

दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) पत्रकार संवाद यात्रेला दि.२८ जुलै रोजी नागपूरातून सुरुवात झाली. विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्र हा पहिला टप्पा आणि दुसऱ्या टप्प्यात मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, पुणे, कोकण विभागांत यात्रा गेली. एकूण २७ जिल्ह्यांच्या ठिकाणी आणि १५० पेक्षा अधिक तालुक्यांमधून साडेपाच हजार किलोमीटरचा प्रवास करून २० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या सभागृहात यात्रेचा समारोप झाला. या यात्रेची निवडक छायाचित्रे व वृत्तपत्रांमधील वर्तांकन....

# मुंबई



**मा. श्री. मंगलप्रभात लोढा**

(कौशल्यविकास मंत्री)

**''पत्रकार संघाचे झुंजार, लढाऊ आणि कार्यक्षम प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यामुळे सामान्य पत्रकारांचे विषय सर्वांसमोर आले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा प्रतिनिधी म्हणून मी उपस्थित आहे. त्यांच्या समवेत लवकरच बैठक लावून विषय मार्गी लावले जातील.''**





सरकारच्या वतीने कौशल्यविकास मंत्री मा.मंगलप्रभात लोढा...



उपस्थित मंत्री ना.पाटील व लोढा यांनी निवेदन स्वीकारले...



उपस्थित राज्यभरातील पत्रकार संघाचे पदाधिकारी...

# मुंबई



**मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील**

(उच्च व तंत्रशिक्षण मंत्री)

**“महाराष्ट्रात पहिल्यांदाच पत्रकारांच्या विषयावर राज्यभर फिरून स्थानिक पातळीवरील सामाजिक, राजकीय परिस्थिती जाणून घेण्याचा आणि आपल्या मागण्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला. यामुळे नेमकं काय घडतय याची उत्सुकता होती. वसंत मुंडेंचे भाषण ऐकताना तो जिवंतपणा जाणवला. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेऊन मागण्यांबाबत निर्णय घेतला जाईल. वसंत मुंडेंचे एकूण काम पाहता त्यांना पत्रकार नेता म्हणून भविष्य आहे.”**





सरकारच्या वतीने उच्च तंत्र शिक्षण मंत्री मा.चंद्रकांतदादा पाटील...



उपस्थित राज्यभरातील प्रमुख पत्रकार...



मंत्री मा.चंद्रकांदादा पाटील आणि प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे...

# मुंबई



**वसंत मुंडे**

**दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचा २० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृहात समारोप झाला. सरकारच्या वतीने ज्येष्ठ मंत्री चंद्रकांतदादा पाटील व मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उपस्थित राहून निवेदन स्वीकारले व भूमिका स्पष्ट केली. यावेळी राज्यभरातून पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवर...



समारोप प्रसंगी बोलतांना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ...



दै.दिव्य लोकप्रभाच्या पत्रकार संवाद यात्रा विशेषांकाचे प्रकाशन...

# मुंबई



**मा. आ. पंकजाताई मुंडे**

‘‘महाराष्ट्रात दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी संघर्षयात्रा काढल्यानंतर सत्तापरिर्वतन झाले. दिवंगत मुंडे यांच्या निधनानंतर मी पुन्हा संघर्षयात्रा काढली तेव्हाही परिवर्तन झाले. आता वसंत मुंडेंच्या यात्रेमुळे पत्रकारांच्या जीवनात बदल घडेल. पत्रकारांच्या मागण्यांबाबत मी विधानपरिषदेत आवाज उठवीन.’’





आमदार पंकजा मुंडे...




आ.पंकजा मुंडे यांच्या समवेत...



आ.पंकजा मुंडे यांना निवेदन देताना प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे...

# मुंबई



**मा. संजय भोकरे**

**''दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढून वसंत मुंडेंनी एक चळवळ उभी केली. पत्रकार उत्तमपणे संवाद करू शकतात हे राज्यातील पत्रकारांनी दाखवून दिले. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांनी संघटित होऊन आपल्या मागण्या मंजूर करवून घेण्यासाठी प्रयत्न केला तर कोणताच विषय शिल्लक राहणार नाही.''**



मुंबईत मा.संजय भोकरे बोलताना...



विश्वास आरोटे, वसंत मुंडे, संजय भोकरे, प्रवीण सपकाळे...



मंत्री मा.चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करताना सिद्धार्थ भोकरे...

# नागपूर



**दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा ही ऐतिहासिक पाऊल असल्याने माध्यम क्षेत्राला सकारात्मक ऊर्जा मिळेल असे मत मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी व्यक्त केले. नागपूर येथील दीक्षाभूमीसमोर संवाद यात्रेला विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे व माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे यांनी हिरवा झेंडा दाखवला.**





दीक्षाभूमी येथे बोलताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे...




नागपूर येथे उद्घाटनास मोठ्या संख्येने उपस्थित पत्रकार...



मा.प्रमोद डोईफोडे व चंदन शिरवाळे यांनी झेंडा दाखवला.

# इलेक्ट्रॉनिक व डिजिटल मीडियाचा पाठिंबा



# नागपूर



**नागपूर येथे संवाद यात्रेच्या पूर्वसंध्येला प्रेस क्लब सभागृहात पत्रकार परिषदेत भूमिका मांडताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे सोबत कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, समन्वयक संतोष मानूरकर**






प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे...



समन्वयक संतोष मानूरकर, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रमोद शेंडे...



नागपूर येथे पत्रकार परिषदेस उपस्थित पत्रकार...

# स्थानिक माध्यमांचे पाठबळ



# वर्धा



**महात्मा गांधी यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या वर्धा येथील सेवाग्राम येथे पत्रकार संवाद यात्रेचे स्थानिक पत्रकारांनी स्वागत केले. बापूंच्या कुटीला भेट दिल्यानंतर सत्य, अहिंसा व शांतीच्या मार्गाने संवाद यात्रेला नवी ऊर्जा मिळाली.**



बापू कुटी येथे संवाद यात्रेतील सहकाऱ्यांसमवेत...



वर्धा येथील अनुप भार्गव, संतोष मानूरकर, भूषण महाजन...



वर्धा येथील स्थानिक पत्रकारांसमवेत...

महाराष्ट्रात तीनशेपेक्षा अधिक ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते पत्रकार संवाद यात्रेच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. त्यापैकी काही निवडक छायाचित्रे...



माजी मंत्री बाळासाहेब थोरात



माजी खासदार भावना गवळी



कराड येथे मा.भरतनाना पाटील



धुळे येथे पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश



भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे



माजी मंत्री सुरेश नवले



दै.पुढारीचे संपादक धनंजय लांबे



सातपूरचे नगरसेवक श्री.दिनकर पाटील, राजेंद्र थोरात

# विविध वृत्तपत्रांचा असाही पाठिंबा









# सामाजिक, राजकीय संघटनांचा पाठिंबा



# अमरावती



**अमरावती जिल्ह्याच्या सीमेपासूनच पत्रकार संवाद यात्रेचे स्थानिक पत्रकारांनी जागोजाची स्वागत केले. विविध धार्मिक स्थळांना नमन करीत गेलेल्या यात्रेत सामाजिक संघटना व नागरिकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.**



संत गाडगे महाराजांच्या समाधीस्थळी...



अमरावती विभागीय अध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार...



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना...

पत्रकारांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी काढलेल्या पत्रकार संवाद यात्रेच्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले.


राष्ट्रवादीचे अध्यक्ष जयंत पाटील


शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक


कर्मवीर सुनिल खांबे, नितीन शिंदे, सुबोध कांबळे


अमरावती म.न.पा.चे डॉ.अजय जाधव


मा.आ.आनंदराव पाटील


संपादक अनिल अग्रवाल, प्रवीण शेगोकार


पद्मश्री डॉ.विकास महात्मे


कारखाना अध्यक्ष भरतसेठ शहा, निळकंठ मोहिते

# अमरावती



**अमरावती शहरातील पत्रकार भवनात पत्रकारांनी संवाद यात्रेचे स्वागत केले. पत्रकारांनी मुक्त संवाद साधत पत्रकारांच्या मागण्यांबाबत अनेक सूचना केल्या आणि त्यावर उपायही सांगितले.**





पत्रकार परिषदेत बोलताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे...






अमरावती शहरातील उपस्थित पत्रकार...







अमरावती जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार, नंदुरबार जिल्हाध्यक्ष जगदीश सोनवणे...

# सामाजिक, राजकीय संघटनांचा पाठिंबा

# अकोला



**अकोला शहरात संवाद यात्रेचे स्वागत झाल्यानंतर शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत शहरी, ग्रामीण भागातून आलेल्या पत्रकारांनी आपल्या भावना व्यक्त करत मागण्यांवर सविस्तर चर्चा केली.**



अकोला येथे जिल्हाध्यक्ष गणेश सुरजासे...



पत्रकार परिषदेत बोलताना वसंत मुंडे समवेत विश्वास आरोटे, गणेश सुरजासे...



अकोला येथे पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकार...

# वैदर्भीय वृत्तपत्रांचा वृत्त-पाठिंबा



# शेगांव



संतनगरी गजानन महाराज यांच्या शेगाव शहरात संवाद यात्रेचे आगमन झाल्यानंतर मंदिरात दर्शन घेतल्यानंतर विश्रामगृहावर स्थानिक पत्रकारांशी मुक्त सवांद झाला. यावेळी जिल्हाभरातील ज्येष्ठ आणि तरुण पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शेगाव येथील पत्रकार परिषद...



शेगाव येथे स्वागत करताना बुलढाणा जिल्हाध्यक्ष सुहास लहाने...



शेगाव येथे 'विश्वजगत' वृत्तपत्राचे प्रकाशन करताना...

# विविध वृत्तपत्रांचा बातम्यांद्वारे खंबीर पाठिंबा



# मुक्ताईनगर



**ॲड.रवींद्रभय्या पाटील**

(अध्यक्ष, मुक्ताई संस्थान)

**''सरकारने सामान्य पत्रकारांच्या मागण्या गांभीर्याने घ्याव्यात. संवाद यात्रेला आमचा पाठिंबा असून मुक्ताई संस्थानचाही आशीर्वाद आहे. वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा माध्यम क्षेत्रात इतिहास घडवेल.''**





मुक्ताईनगर येथे संत मुक्ताईचे दर्शन...




मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष ॲड.रवींद्रभैय्या पाटील स्वागत करताना...



अध्यक्ष ॲड.रवींद्रभैय्या पाटील यांच्या समवेत...

## पत्रकार संवाद यात्रेचे उद्दिष्ट व भूमिका मांडणाऱ्या पोस्टरचे मान्यवरांकडून प्रकाशन.


## काही निवडक छायाचित्रे


माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड


खा.अमोल काल्हे, आ.संदीप क्षीरसागर, ॲड.उषा दराडे


आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे


इंदापूर येथे माजी मंत्री दत्तामामा भरणे


माजी मंत्री बाळासाहेब पाटील


जळगाव जिल्हाधिकारी निवेदन स्वीकारताना


जैन उद्योगसमूहाचे अशोक जैन, प्रवीण सपकाळे, सचिन गोसावी, भूषण महाजन

# जळगांव




**सौ.रोहिणी खडसे**
(प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी महिला काँग्रेस)

**जळगाव शहरात महाराणा प्रताप पुतळ्याजवळ सौ.रोहिणी खडसे यांनी उपस्थित राहून पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत केले. पत्रकारांच्या मागण्यांबाबत पक्षाचा पाठिंबा जाहीर केला. पत्रकार हा समाजाचा मुख्य घटक आहे. त्यांच्या मागण्या सरकारने सोडवाव्यात अशी मागणी केली.**



जळगाव येथे प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, सचिन गोसावी...



ज्येष्ठ पत्रकारांकडून स्वागत...




महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास अभिवादन...

# संवाद यात्रेला स्थानिक दैनिकांचा प्रतिसाद


केसरी
पत्रकारांनासुद्धा आता आपल्या मतांची ताकद दाखवावी ला
अक्षराज
पत्रकारांना सर्व समाज घटकांनी साथ द्यावी : वसंत मुंडे
लोकप्रभा
जळगावात पत्रकार सं
यात्रेवर जेसीबीने पुष्पवृ
दैनिक भास्कर
Date : 14 Aug 2024
Day : Wednesday
पत्रकारों के लिए स्वतंत्र आर्थिक विकास महामंडल की स्थापना करें
नवराष्ट्र
...तर ३ स्तंभ योग्य दिशेने काम करतील
नवराष्ट्र
...तर ३ स्तंभ योग्य दिशेने काम करतील
जागर मराठी
पत्रकार संवाद यात्रेचे २८ जुलैपासून राज्यव्यापी वादळ घोंगावणार
वर्धा महात्मा गांधी बापू नगरीत पत्रकार संवाद यात्रेचे भव्य स्वाग
अक्षराज
कार्यारंभ
पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र, राज
सरकारने योग्य ती पावले उचलावे
लोकराष्ट्र
Date : 14 Aug 20
Day : Wednesd
पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन क
पंकजाताई मुंडे यांना पत्रकारांचा प्रश्न ?
पत्रकारों की पत्रकार संवाद
यात्रा का पोस्टर विमोचन

# जळगांव



**जळगाव शहरात पत्रकार परिषदेत संवाद यात्रेची भूमिका मांडल्यानंतर उपस्थित ज्येष्ठ व तरुण पत्रकारांनी उत्फूर्तपणे पाठिंबा दिला. तर दूरचित्रवाणी वाहिनीचे पत्रकार किशोर पाटील यांनी पत्रकारांच्या जगण्यावर सादर केलेल्या कवितेने सर्वांचेच डोळे पाणावले.**




प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, प्रवीण सपकाळे, सचिन गोसावी, गणेश सोनवणे...



जळगाव शहरातील उपस्थित पत्रकार...



जळगाव शहरातील उपस्थित पत्रकार...

## महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद यात्रेच्या पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते उत्साहात केले. त्याची ही झलक...



ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे




मंत्री गुलाबराव पाटील



माजी आमदार ॲड.उषाताई दराडे



माजी मंत्री बच्चू कडू



अहमदनगर जिल्हाधिकारी



क्रीडाईचे जितेंद्रभाई मेहता, रोहिदास पाटील राजरत्न इंगळे



जि.प.सदस्य पदम सिंग पाटील, खान्देश अध्यक्ष किशोर रायसाकडा

# अंमळनेर



**अंमळनेर येथे मंगळग्रह मंदिरात पत्रकार संवाद यात्रेचे संस्थानच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी परिसरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्याशी मुक्त संवाद झाला.**



मंगळग्रह मंदिर येथे संस्थानच्या वतीने स्वागत...



पाळदी शहरात स्थानिक पत्रकारांच्या वतीने स्वागत...



पाळदी शहरात वाद्यांच्या गजरात स्वागत...

# प्रश्न पत्रकारांचे
# त्यांना व्यासपीठ
# स्थानिक
# माध्यमांचे



# धुळे




**धुळे शहरात साने गुरुजी यांच्या पुतळ्यास अभिवादन करून यात्रेचे स्थानिक पत्रकारांनी जल्लोषात स्वागत केले. शासकीय विश्रामगृह आणि धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघात भरगच्च पत्रकार परिषदांमध्ये मुक्त संवाद झाला.**




धुळे येथील पत्रकार परिषद...



धुळे येथील पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकार...



धुळे शासकीय विश्रामगृहावर पत्रकारांशी सवांद...

## मान्यवरांच्या हस्ते
## ठिकठिकाणी
## झाले पोस्टरचे प्रकाशन.
## पत्रकार संवाद यात्रा कशासाठी
## याची तपशीलाने मांडणी
## हे पोस्टरचे वैशिष्ट्य होय !
## त्याची ही
## निवडक छायाचित्रे.



मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे



माजी मुख्यमंत्री मा.पृथ्वीराज चव्हाण



मंत्री मा.दादा भुसे



माजी मंत्री बच्चू कडू



राष्ट्रीवादी अध्यक्ष रंजन ठाकरे, राहुल सरोदे व ज्ञानेश्वर आवाड



आमदार मा.सत्यजित तांबे, गणेश देगावकर



मंत्री मा.रवींद्र चव्हाण, आमदार मा.निरंजन डावखरे, सुबोध कांबळे

# धुळे



धुळे शहरात मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषदेत अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी कोरोनानंतर बदललेल्या परिस्थितीमधील समस्यांवर चर्चा केली. तरुण पत्रकारांनी अडचणी सांगत उपायही सुचवले. धुळे शहरात पत्रकारांनी संवाद यात्रेचे अभूतपूर्व स्वागत केले.






धुळे येथील पत्रकार परिषद...



धुळे येथील पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकार...



वृत्तपत्राचे प्रकाशन करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, धुळे जिल्हाध्यक्ष जितेंद्रसिंह राजपूत

# संवाद यात्रेला स्थानिक माध्यमांचा पाठिंबा



# शिर्डी



दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप शिर्डी येथे झाला. यावेळी उत्तर महाराष्ट्रातील पत्रकार आणि विविध पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.





संपादक सेवा संघाचे किसनभाऊ हसे, नगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, सोमनाथ काळे...



शिर्डी येथे बोलताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे...



स्वागत करताना दत्ता गाडगे, सोमनाथ काळे, सरचिटणीस विश्वास आरोटे...

महाराष्ट्रातील मंत्री, आमदार
व विविध पक्ष संघटनांच्या
पदाधिकाऱ्यांनी
पत्रकार संवाद यात्रेच्या
पोस्टरचे उत्साहात
प्रकाशन केले.
त्याची ही छायाचित्रे.




मदत व पुनर्वसनमंत्री मा.अनिल पाटील


ग्रामविकास मंत्री मा.गिरीश महाजन


माजी मंत्री मा.हर्षवर्धन पाटील


मंत्री मा.हसन मुश्रीफ


लोकमतचे संपादक नंदकिशोर पाटील, प्रशांत सुर्यतळे, मनोज पाटणी


नवी मुंबई संपादक सुभाष जाधव, दशरथ चव्हाण


समाजसेवक नानजीभाई ठक्कर, कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे पोस्टरचे प्रकाशन करताना